Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेसनोट 11/10/2021

## गुंडा विरोधी पथकाकडुन रावण टोळीचे मोक्का गुन्हयात फरार असलेले ०४ व दोन फायरींगच्या गुन्हयात फरारी असलेला ०१ असे एकुण ०५ सराईत आरोपींना कराड जि.सातारा येथुन अटक तसेच सराईत तडीपार गुंडास पिस्तुलासह रावेत परीसरातुन अटक, १३,१३,५००/- रु. ची मारुती ब्रेझा गाडी, ०३ गावठी पिस्तुले व ०७ जिवंत काडतुसे जप्त.

चिखली पोलीस ठाणे गु.र.नं.३२९/२०२१ भा.द.वि.क ३०७,१४३,१४४, १४७, १४८,१४९ भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ तसेच महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) या गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे **१) सुरज चंद्रदत्त खपाले, वय २२ वर्षे, रा आंबेडकर भवन समोर, चिंतामणीनगर, रोकडेवस्ती, चिखली, पुणे २) ह्तीक ऊर्फ मुंग्या रतन रोकडे, वय २१ वर्षे, रा आंबेडकर भवन समोर, चिंतामणीनगर, रोकडेवस्ती, चिखली, पुणे ३) सचिन नितीन गायकवाड, वय २१ वर्षे, रा मारुती मंदीरामागे, चिखली गावठाण, पुणे ४) अक्षय गोपीनाथ चव्हाण, वय २४ वर्षे, रा तुकाराम मोरे यांचे खोलीत, मारुती मंदीरा जवळ, चिखली गावठाण, पुणे** यांचा तांत्रीक व पारंपारीक पध्दतीने तपास करुन सदरचे आरोपी हे कराड जि. सातारा परीसरात वास्तव्यास असलेबाबत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गोवा, महाबळेश्वर तसेच कराड शहर व परीसरात सलग १० दिवस तपास करुन सदरचे आरोपी हे घारेवाडी गावाचे जवळ, ता कराड, जि सातारा या ठिकाणी दि.०८/१०/२०२१ रोजी येणार असले बाबत माहीती प्राप्त करुन सदर ठिकाणी स्थानिक पोलीसांचे मदतीने सापळा रचुन वरील आरोपींना तसेच चोपडा पोलीस ठाणे जिल्हा जळगाव, उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर तसेच वाकड पोलीस ठाणेकडील ०३ गुन्हयात फरारी असलेला व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अभिलेखावरील रावण टोळीचा सक्रिय आरोपी नामे **५) अनिरुध्द ऊर्फ बाळा ऊर्फ विकी राजु जाधव, वय २४ रा.जाधववस्ती, जाधववस्ती, रावेत, पुणे** यांचेसह शितफिने पकडुन आरोपी १ ते ४ यांना पिंपरी चिंचवड येथे आणुन मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो. देहुरोड विभाग, पिं. चिं. यांचे समक्ष हजर केले असुन त्यांची दि.१३/१०/२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे. तसेच आरोपी क्र. ५ यास वाकड पोलीस ठाणे येथे हजर केले असता तपासामध्ये त्याचेकडुन ०२ गावठी पिस्तुले व ०५ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. त्याची दि.१२/१०/२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

तसेच दि.०९/१०/२०२१ रोजी पोलीस अंमलदार शुभम कदम यांना मिळालेल्या बातमीनुसार रावण टोळीचा सराईत तडीपार गुंड नामे **६) करण रतन रोकडे, वय २३ वर्षे, रा आंबेडकर भवन समोर, चिंतामणीनगर, रोकडेवस्ती, चिखली, पुणे** हा तडीपार असताना रावेत पुणे येथे लाल रंगाची ब्रेझा कार क्र. MH14-JM-2797 मधुन येणार असले बाबत मिळालेल्या माहीतीच्या आधारे त्यास ०१ गावठी पिस्तुल व ०२ काडतुस व ब्रेझा कार असा एकुण रु. १२,४१,०००/- मालासह ताब्यात घेवुन त्याचे विरोधात देहुरोड पोलीस ठाणे अंकित रावेत पोलीस चौकी येथे गु.र.नं. ५७१/२०२१, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, १४२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन आरोपीस मा. न्यायालयाने दि.१२/१०/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.कृष्ण प्रकाश सो.पोलीस आयुक्त, मा.डॉ.श्री.संजय शिंदे सो.अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. आनंद भोईटे सो. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) मा.श्री. प्रशांत अमृतकर सो. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे-१) यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार - हजरत पठाण, प्रविण तापकिर, गंगाराम चव्हाण, विजय तेलेवार, गणेश मेदगे, रामदास मोहीते, शुभम कदम व ज्ञानेश्वर गिरी व TAW चे सपोफौ राजेंद्र शेटे व पो.हवा. नागेश माळी यांनीकेली आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय


BHARAT
LIVE

